क्र.पोमसं/१/पदोन्नती-बदली/३३-११/२०२२
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई -४०० ००१.
दिनांक : ०८/११/२०२२.

**संदर्भ:** शासन आदेश क्र. आयपीएस-२०२२/प्र.क्र.३९२/दोन/पोल-१, दि.०७/११/२०२२

**विषय:-** भापोसे अधिकाऱ्यांच्या वरिष्ठ समय श्रेणीत (Senior Time Scale) पदस्थापना.

****

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम २२(न)मधील तरतुदीनुसार भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी यांची वरिष्ठ समय श्रेणीत (Senior Time Scale) पदस्थापना करण्यात आली आहे. (सोबत शासन आदेशाची प्रत जोडली आहे )

२. नियंत्रक अधिकारी यांना विनंती करण्यात येते की,

(अ) नियंत्रक अधिकारी यांनी संबधित अधिकारी यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यानंतर संबधित अधिकारी यांनी बदलीच्या पदावर पदग्रहण अवधी न उपभोगता बदलीच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे.

(ब) नियंत्रक अधिकारी यांनी मा.न्यायालय यांचे आदेश, निवडणुकीची आदर्श आचारसंहिता याचा भंग होणार नाही हयाची दक्षता घ्यावी.

(क) उपरोक्त आदेशांतील अधिकाऱ्यांच्या पदभार हस्तांतरण प्रमाणपत्रांच्या प्रती कृपया सत्वर या कार्यालयास पाठवाव्यात.

पोलीस महासंचालक यांनी संबधित अधिकारी यांचे वरिष्ठ समय श्रेणी मिळाल्याबाबत अभिनंदन केले आहे.

(संजीव कुमार सिंघल)
अपर पोलीस महासंचालक, (आस्थापना)
पोलीस महासंचालक, यांचे करीता.

प्रति,
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर/कोकण/नागपूर/नाशिक /नांदेडपरिक्षेत्र,
पोलीस अधिक्षक, सातारा, सांगली, नाशिक, जळगांव, नांदेड, परभणी, हिंगोली, गडचिरोली
सर्व संबधित अधिकारी

प्रत :-
अपर पोलीस महासंचालक (का व सु),महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, (का व सु),महाराष्ट्र राज्य, मुंबई

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ महाराष्ट्र राज्य, मुंबई
अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
पोलीस महासंचालक यांचे स्वीय सहायक
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई.
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.

२/- सदरचे आदेश " Promotion & Transfer Order of Addl.SP" शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेतस्थळावर दोन महिन्यांकरीता कृपया प्रसिध्द करण्यात यावेत.

प्रत सस्नेह सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुर चौक, मुंबई
(लक्षवेध : श्री. स्वप्नील बोरसे, अवर सचिव)

**भा.पो.से. अधिका-यांच्या वरिष्ठ समय श्रेणीत *(Senior Time Scale)* पदस्थापनेबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
### शासन आदेश क्र. आयपीएस-२०२२/प्र.क्र.३९२/दोन/पोल-१.

दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन-४०० ०३२.

दिनांक : ०७ नोव्हेंबर २०२२.

**शासन आदेश-**

महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२न यामधील तरतुदींनुसार, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद भा.पो.से. अधिका-यांची, स्तंभ (४) मध्ये निर्दिष्ट पदांवर *(वरिष्ठ समय श्रेणी)*, याद्वारे, पदस्थापना करण्यात येत आहे:-

| अ.क्र. (१) | भा.पो.से. अधिका-याचे नाव (२) | विद्यमान पदस्थापना (३) | पदोन्नतीने पदस्थापना (४) |
|---|---|---|---|
| १. | श्रीम. आंचल दलाल | उप विभागीय पोलीस अधिकारी, सातारा | अपर पोलीस अधीक्षक, सांगली |
| २. | श्री. अबिनाश कुमार | उप विभागीय पोलीस अधिकारी, परभणी | अपर पोलीस अधीक्षक, नांदेड |
| ३. | श्री. निलेश तांबे | उप विभागीय पोलीस अधिकारी, महाड, जिल्हा-रायगड | अपर पोलीस अधीक्षक, मालेगांव, नाशिक (ग्रा.) |
| ४. | श्री. कुमार चिंता | उप विभागीय पोलीस अधिकारी, जळगांव | अपर पोलीस अधीक्षक, गडचिरोली |
| ५. | श्री. यतिश देशमुख | उप विभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली | अपर पोलीस अधीक्षक, गडचिरोली |

२. तसेच, श्री. निलेश मोरे, रा.पो.से., यांची *"अपर पोलीस अधीक्षक, नांदेड"* या पदावरुन, महाराष्ट्र पोलीस अधिनियम याच्या कलम २२न यामधील तरतुदींनुसार, याद्वारे, बदली करण्यात येत असून त्यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येतील.

३. त्या अनुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण/न्यायालय यांचे आदेश, निवडणुकीची आदर्श आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था, इत्यादी लक्षात घेऊन पुढील उचित कार्यवाही करावी.

४. हा शासन आदेश, पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक १ यांच्या शिफारशीचा यथायोग्य विचार करुन आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम याच्या कलम २२न मध्ये निर्दिष्ट सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२११०७१९३६०५६५२९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( व्यंकटेश भट )**
शासनाचे सह सचिव.

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत-**

१) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण/कोल्हापूर/नागपूर परिक्षेत्र.
२) पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र.
३) पोलीस अधीक्षक, सातारा/सांगली/नाशिक/ जळगांव/नांदेड/परभणी/ हिंगोली/ गडचिरोली.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी/ लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा/सांगली/नाशिक/जळगांव/नांदेड/परभणी/ हिंगोली/गडचिरोली.
६) संबंधित पोलीस अधिकारी *(पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत).*
७) अवर सचिव, पोल-१अ, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सहायक संचालक, भा.पो.से. कक्ष, मंत्रालय, मुंबई.
९) निवड नस्ती, पोल-१.